**नियमित दिवाणी मुकदमा क्र.१२५/२०१३ मधील नि.क्र.३६ वरील आदेश**

प्रस्तुतचा दावा वादग्रस्त मिळकतींचे वाटप होवून कब्जा मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी त्यांचेविरुध्द झालेला दावा विना कैफियत चालविण्यात यावा असा आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर प्रतिवादींचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.०१ याची पत्नी ही चार वर्षापासून मोठया आतडयाच्या कर्करोगाने आजारी असून, अत्यवस्थ आहे. ती अंथरुणाला खिळून असून, तिचेवर सातत्याने वेगवेगळया रुग्णालयांमध्ये औषधोपचार सुरु आहेत. तिचेवर गॅलेक्सी हॉस्पीटल म्हापसा गोवा येथे शस्त्रक्रिया करण्यात आलेली असून केमोथेरपी देखील करण्यात आलेली आहे. तिचेवर मणीपाल हॉस्पीटल, डोनापावला, पणजी गोवा येथे किरणोत्सर्ग उपचार करण्यात आलेले असून, नारायण ऋदयालय बंगलोर कर्नाटक राज्य येथे सीटीस्कॅन चाचणीकरीता तिला दाखल करण्यात आलेले होते. प्रतिवादी क्र.०१ यास त्याच्या पत्नीच्या आजारावरील उपचाराकरीता सातत्याने परगांवी जावे लागत असून, कित्येक महिने मुक्कामास रहावे लागत आहे. प्रतिवादी क्र.०१ यास त्याच्या पत्नीच्या गंभीर स्वरुपाच्या आजारामुळे औषधोपचारांकडे यत्किंचितही दुर्लक्ष करता येत नाही आणि त्यामुळे गेली चार वर्ष त्याचे पत्नीच्या औषधोपचारांमुळे तो व्यग्र आहे. प्रतिवादी क्र.०१ यास मधुमेहाचा त्रास असुन त्याची तब्येत वारंवार बिघडत असते. प्रतिवादी क्र.०१ याच्या वार्धक्यात त्याच्या पत्नीस जडलेल्या दुर्धर व्याधीमुळे त्याचे मानसिक खच्चीकरण झालेले आहे. प्रतिवादी क्र.०२ यास सुमारे ०७ वर्षापासून मधुमेहाचा त्रास असून, त्याच्या दोन्ही पायास नेहमी सूज येते व जखमा होतात. प्रतिवादी क्र.०२ यास देखील त्याच्या आजारावरील औषधोपचाराकरीता वारंवार रुग्णालयामध्ये दाखल व्हावे लागते. सदर कारणांमुळे दोन्ही प्रतिवादींना विहित मुदतीत कैफियत दाखल करता न आल्यामुळे त्यांचेविरुध्द विनाकैफियतचा आदेश पारीत झालेला आहे. त्यांची कैफियत अभिलेखावर असणे न्यायहितार्थ आवश्यक आहे. सदर प्रतिवादींच्या कैफियतीविना दावा चालविला गेल्यास त्यांचा बचाव त्यांना सक्षमपणे न्यायालयासमोर मांडता येणार नाही. अर्ज नामंजूर करण्याने प्रतिवादींचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरुन येणारे अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करणेत यावा व प्रस्तुत प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी केलेली आहे.

०३.  वादीने नि.क्र.४० वर आपले म्हणणे सादर करुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. वादीचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळ असून, त्यामध्ये नमूद अर्जातील सर्व कारणे खोटी आहेत. प्रस्तुत प्रतिवादींना ब—याचवेळा संधी देवून देखील त्यांनी दाव्याची कैफियत देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केलेली आहे. या सर्व प्रकारामुळे न्यायालयाचा वेळ देखील वाया गेलेला आहे. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादींनी केलेली आहे.

०४.  उभयपक्षकारातर्फे संपुर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले. त्यावरुन असे दिसुन येते की, दि.०४/०३/२०१४ रोजी प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांचेविरुध्द, दावा त्यांचे कैफियतीशिवाय चालविणेत यावा असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सदर आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी प्रस्तुत प्रतिवादींनी दि. २९/०८/२०१६ रोजी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०५.  अर्जाचे अवलोकन केले असता; प्रतिवादी क्र.०१ याच्या पत्नीस आतडयांचा कर्करोग असल्यामुळे आणि वेगवेगळया रुग्णालयांमध्ये तिचेवर औषधोपचार सदर प्रतिवादीस करावे लागत असल्यामुळे त्यास हजर राहून कैफियत दाखल करता आली नाही असे त्याचे मुख्यत्वे कथन आहे असे दिसते. तसेच प्रतिवादी क्र.०२ यास असलेल्या मधुमेहाच्या आजारामुळे औषधोपचारांकरीता वारंवार रुग्णालयांमध्ये त्यास जावे लागत असल्यामुळे त्याला विहित मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही असे त्याचे कथन आहे. नि.क्र.४७ वरील यादीसमवेत प्रतिवादी क्र.०१ याच्या पत्नीच्या आजारपणासंबंधी सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आलेला आहे. त्यावरुन उमाक्षी अनंत निखार्गे ही कर्करोगाने त्रस्त आहे असे सकृतदर्शनी दिसते. तथापि; प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या तथाकथित मधुमेहाच्या आजारपणाच्या संबंधी कोणतीही कागदपत्रे त्यांनी प्रस्तुत अर्जासोबत दिलेली नाहीत. तरी परंतु, दाव्यातील मागणी ही वादग्रस्त मिळकतींमध्ये व वादग्रस्त इमल्यांमध्ये वादी आणि प्रतिवादी क्र.०३ ते ०६ यांचे हिस्से आहेत असा ठराव होवून मिळणेकरीता व त्यातील हिश्श्यांचे धडेवाटप होवून मिळण्यासाठी दाखल केलेली आहे हे स्पष्ट होते. वादग्रस्त परिशिष्ट ‘क’ मधील मिळकत ही वादी आणि प्रतिवादी क्र.०१ ते २३ यांची सामाईक मालकी कब्जेवहिवाटीची मिळकत असल्याचे वादकथन सादर झालेले आहे. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता; प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना त्यांचा बचाव मांडण्याची संधी मिळणे उचित होणार आहे. प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना कैफियत अभिलेखावर सामिल करुन देण्याची परवानगी दिली गेल्यास दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय

गुणवत्तेवर करण्यास सुलभ होणार आहे. तथापि; प्रस्तुत प्रतिवादींनी कैफियत दाखल करण्यास जो दिर्घ विलंब केलेला आहे; तो पहाता त्यांचेवर एकूण रु.६००/—(रुपये सहाशे मात्र) इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादीस देवू करुन अर्ज मंजूर करणे उचित राहील. करीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

०१. अर्ज प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांचेवर र.रु.६००/— (रक्कम रुपये सहाशे मात्र) खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

०२. नि.क्र.०१ वरील दि.०४/०३/२०१४ रोजीचा प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांचेविरुध्द 'दावा विना कैफियत चालविण्यात यावा' असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

०३. खर्चाची रक्कम पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी वादीस अदा करणेत यावी. तसे न केल्यास, प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

स्वाक्षरीत/—

स्थळ : सावंतवाडी.
दिनांक : ०६ एप्रिल, २०१७.

(आर. आर. काळे.)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
सावंतवाडी.